**८**

**उपजिल्हाधिकारी भुसंपादन ल.पा.बीड यांजकडून**
**नविन भुसंपादन कायदा -२०१३ च्या कलम १९(१) खालील अधिसुचना जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालय, जि.बीड (भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम -२०१३ नुसार) जमीन संपादन पाझर तलाव क्रमांक १,मौजे भुरेवाडी ता.पाटोदा जि.बीड साठी भुसंपादन**

**दिनांक :- .१०.२०२५**

**क्रमांक-२०२५/एलएनक्यु/एसआर ३३/२००५.–** ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यास भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१)व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना, महसुल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूचि एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीचा, अनुसुचि दोन मध्ये अधिक तपशीलवार विनीर्दिष्ठ केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, बीड जिल्हयाच्या जिल्हाधिका-याचे, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत खात्री पटली आहे, आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी अनुसुची तिन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषीत केले असुन,पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसुचि चार मध्ये विनिर्दिष्ट केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी,उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भुसंपादन ल.पा.बीड यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव :-** पाझर तलाव क्र.१,मौजे भुरेवाडी ता.पाटोदा जि.बीड

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | ३१५ पै. | ०.०४ |
| २ | ३१६ पै. | ०.६२ |
| ३ | ३१७ पै. | ०.५४ |
| | **एकुण** | **१.२०** |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव : पाझर तलाव क्र.१,मौजे भुरेवाडी ता.पाटोदा जि.बीड

प्रकल्पाच्या कामाचे वर्णनः-पाझर तलाव क्र.१,मौजे भुरेवाडी ता.पाटोदा जि.बीड या सार्वजनिक कामाचे प्रयोजन

सामाजिक फायदे :-शेती पिकासाठी पाणी व जनावरांना पाणी व इतर सार्वजनिक हितार्थ

**अनुसूची- तीन**

**पुर्नवसाहत क्षेत्राचे वर्णन गावाचे नांव :-** पाझर तलाव क्र.१,मौजे भुरेवाडी ता.पाटोदा जि.बीड

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| | लागु नाही | |

**अनुसूची - चार**

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.) दिनांक १३मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र,३/अ-२,नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

**टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) ल.पा.बीड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.**

**दिनांक :- .१०.२०२५**
**ठिकाण :- बीड**

**(सतीश धुमाळ)**
**उपजिल्हाधिकारी भुसंपादन,**
**लघुपाटबंधारे बीड..**